यें ॥ ४ ॥ कर्मभूमी ऐसा ठाव । वेवसाव जाणावा ॥ ५ ॥ तुका ह्मणे उत्तम जोडी । जातो घडी नरदेह ॥ ६ ॥

॥ ४८८६ ॥ भय हरिजनीं । कांहीं न धरावें मनीं ॥ १ ॥ नारायण ऐसा सखा । काय जगाचा हा लेखा ॥ २ ॥ चित्त वित्त हेवा । समर्पून रहा देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन । असों द्यावें समाधान ॥ ४ ॥

॥ ४८८७ ॥ कांरे माझीं पोरें ह्मणसील ढोरें । मायबाप खरें काय एक ॥ १ ॥ कांरें गेलें ह्मणोनि करिसी तळमळ । मिथ्याचि कोल्हाळ मेलियाचा ॥ २ ॥ कांरे माझें माझें ह्मणसील गोत । नो सांडविती दूत यमा हातीं ॥ ३ ॥ कांरे मी बळिया ह्मणविसी ऐसा । मरणापाशीं कैसा उचलविसी ॥ ४ ॥ तुका ह्मणे न धरीं भरंवसा कांहीं । वेगीं शरण जाई पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ४८८८ ॥ कां न वजावें बैसोनि कथे । ऐसें ऐकाहो श्रोते ॥ पांडुरंग तेथें । उभा असे तिष्ठत ॥ १ ॥ ह्मणउनि करी धीर । लक्ष लावूनि सादर ॥ भवसिंधुपार । असेल ज्या तरणें ॥ २ ॥ कथे कांहीं अणुमात्र । नो बोलावें हा वृत्तांत ॥ देवभक्तां चित्त । समरसीं खंडणा ॥ ३ ॥ कां वैष्णवा पुजावें । ऐका घेईल जो भावें ॥ चरण रजा शिवावें । वोडविला मस्तक ॥ ४ ॥ ऐसें जाणाहे निभ्रांत । देव वैष्णवांचा अंकित ॥ अलिप्त अतीत । परमीत त्यां साठीं ॥ ५ ॥ घालोनी लोळणी । तुका आला लोटांगणीं ॥ वंदी पायवणीं । संत चरणींचें माथां ॥ ६ ॥

॥ ४८८९ ॥ वर्णावी ते थोरी एका विठ्ठलाची । कीर्ती मानवाची सांगों नये ॥ १ ॥ उदंडचि झाले जन्मोनियां मेले । होऊनियां गेले राव रंक ॥२॥ त्यांचें नाम कोणी नेघे चराचरीं । साही वेदचारी वर्णिताती ॥३॥ अक्षय अढळ चळेना ढळेना । तया नारायणा ध्यात जावें ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुह्मी विठ्ठल चित्तीं ध्यातां । जन्ममरणव्यथा दूर होती ॥ ५ ॥

॥ ४८९० ॥ नये वांटूं मन । कांहीं न देखावें भिन्न ॥ १ ॥ पाय विठोबाचे चित्तीं । असों द्यावे दिवसराती ॥ २ ॥ नये काकुळती । कोणा यावें हरिभक्ति ॥ ३ ॥ तुका ह्मणे साई । करील कृपेची विठाई ॥ ४ ॥

॥ ४८९१ ॥ वंदिलें वंदावें जीवाचिये साटीं । किंवा बरी तुटी आरंभींच ॥ १ ॥ स्वहिताची चाड ते ऐका हे बोल । अवघेंचि मोल धीरा अं-

गीं ॥ २ ॥ सिंपिलें तें रोप वरीवरी बरें । वाळलिया वरी कोंभ नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे टाकी घायें देवपण । फुटलिया जन कुला पुसी ॥ ४ ॥

॥ ४८९२ ॥ आम्हा विष्णु दासां हेंचि भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥ १ ॥ वाणी नाहीं घ्यावें आपुलिया हातें । करोनियां चित्तें समाधान ॥ २ ॥ तुका ह्मणे द्रव्य मेळविलें मागें । हें तों कोणासंगें आलें नाहीं ॥ ३ ॥

॥ ४८९३ ॥ सुखाचे व्यवहारीं सुखलाभ झाला । आनंदें कोंदला मागें पुढें ॥ १ ॥ संगती पंगती देवासवें घडे । नित्यानित्य पडे तेंचि सांचा ॥ २ ॥ समर्थाचे घरीं सकळ संपदा । नाहीं तुटी कदा कासयाची ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें लाभाचिया कोटी । बहु वाव पोटीं समर्थाचे ॥ ४ ॥

॥ ४८९४ ॥ अग्नि हा पाचारी कोणासी साक्षेपें । हिंवे तोचि तापे जाऊनियां ॥ १ ॥ उदक म्हणे काय याहो मज प्यावें । तृषित तो धांवे सेवावया ॥ २ ॥ काय वस्त्र म्हणे यावो मज नेसा । आपुले स्वइच्छा जग वोढी ॥ ३ ॥ तुक्यास्वामी ह्मणे काय मज स्मरा । आपुल्या उद्धारा लागुनियां ॥ ४ ॥

॥ ४८९५ ॥ विष पोटीं सर्पा । जन भीतें तया दर्पा ॥ १ ॥ पंच भूतें नाहीं भिन्न । गुण दुःख देती शीण ॥ २ ॥ चंदन प्रिय वासें । आवडे तें जाती ऐसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे दाणा । कुचर मिळों नयेअन्ना ॥ ४ ॥

॥ ४८९६ ॥ भल्याचें दर्शन । तेथें शुभचि वचन ॥ १ ॥ बोलावी हे धर्मनीत । क्षोभें होत नाहीं हित ॥ २ ॥ मर्यादा ते बरी । वेळ जाणावी चतुरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहू । लागे ऐसें बरें मऊ ॥ ४ ॥

॥ ४८९७ ॥ सर्वा भूतीं द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारोन ॥ उपतिष्ठे कारण । तेथें बीज पेरीजे ॥ १ ॥ पुण्य करितां होय पाप । दुग्ध पाजोनि पोशिला साप ॥ करोनि अघोर जप । दुःख विकत घेतलें ॥ २ ॥ भूमी पाहतां नाहीं वेगळी । माळ बरड एक काळी ॥ उत्तम निराळी । मध्यम कनिष्ठ ॥ ३ ॥ ह्मणोनि विवेकें । कांहीं करणें निकें ॥ तुका ह्मणे फिकें । रुची ने दी मिष्टान्न ॥ ४ ॥

॥ ४८९८ ॥ देवावरी भार । वृत्ति अयाचित सार ॥ १ ॥ देह देवाचे सांभाळी । सार योजे यथाकाळीं ॥ २ ॥ विश्वासीं निर्धार । विस्तारील विश्वंभर ॥ ३ ॥ तुका ह्मणे व्हावें । बळ एकचि जाणावें ॥ ४ ॥

॥ ४८९९ ॥ थोर ती गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥ १ ॥ व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ॥ २ ॥ घोडें काय थोडें वागविते ओझें । भावेंविण तैसें पाठांतर ॥ ३ ॥ तुका ह्मणे धरा निष्ठावंत भाव । जरी पंढरीराव पाहिजे तो ॥ ४ ॥

॥ ४९०० ॥ नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥ १ ॥ अनुभव येथें व्हावा शिष्टाचार । न चलती चार आह्मांपुढें ॥ २ ॥ निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें पाहिजे जातीचें । येरा गावाळाचें काय काम ॥ ४ ॥

॥ ४९०१ ॥ लोह कफ गारा सिद्ध हे सामुग्री । अग्नि टणत्कारी दिसों येतो ॥ १ ॥ सांगावें तें कायी सांगावें तें कायी । चित्ता होय ठायीं अनुभव तो ॥ २ ॥ अन्नें मागों येतो तृप्तीचा अनुभव । करूनि उपाव घेऊं हेवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मिळे जीवनीं जीवन । तेथें कोणा कोण नांव ठेवी ॥ ४ ॥

॥ ४९०२ ॥ दिली मान तरी नेणावी शत्रूची । शरण आलें त्यासी जतन जीवें ॥ १ ॥ समर्थासी असे विचाराची आण । भलीं पापपुण्य विचारावें ॥ २ ॥ काकुळतीसाठीं सत्ताचा विसर । पडिलें अंतर न पाहिजे ॥ ३ ॥ तुका ह्मणे यश कीर्ति आणि मान । करितां जतन देव जोडे ॥ ४ ॥

॥ ४९०३ ॥ आळणी ऐसें कळों आलें । त्यासी भलें मौनचि ॥ १ ॥ नये कांहीं वेचूं वाणी । वेडे घाणीसांगातें ॥ २ ॥ वेगळें तें देहभावा । भ्रम जीवा माजिरा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कवतुक केलें । किंवा भलें दवडितां ॥४॥

॥ ४९०४ ॥ कोणाशीं विचार करावा सेवटीं । एवढ्या लाभें तुटी झाल्या तरे ॥ १ ॥ सांभाळितो शूर आला घावडाव । पुढें दिला पाव न करी मागें ॥ २ ॥ वाव तो या नांवें येथें अंतराय । अंतरल्या पाय गोविंदाचे ॥ ३ ॥ तुका ह्मणे गड संदिचा हा ठाय । अंतरल्या पाय गोविंदाचे ॥ ४ ॥

॥ ४९०५ ॥ दंड अन्यायाच्या माथां । देखोनि करावा सर्वथा ॥ १ ॥ नये उगे बहुतां घालूं । सिसें सोनियांत आटूं ॥ २ ॥ पापपुण्यासाठीं । नीत केली सत्ता खोटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । दोष कोणाचा तो दावा ॥ ४ ॥

॥ ४९०६ ॥ सुखरूप चाली । हळूहळू उसंतिली ॥ १ ॥ बाळगोपाळां-ची वाट । सेव्यसेवकता नीट ॥ २ ॥ जरी झाला श्रम । तरी पडों नये भ्रम ॥ ३ ॥ तुका म्हणे दासां । देव सरिसासरिसा ॥ ४ ॥

॥ ४९०७ ॥ परद्रव्य परकांता । नातळे जयाचिया चित्ता ॥ आणि कर्मी तो तत्वतां । बांधला न वजाय ॥ १ ॥ ऐसा अनुभव रोकडा । विश्वासी तो जीवा जोडा ॥ एकांत या पुढां । अवघा करी उकल ॥ २ ॥ सकट आंबलें तें अन्न । शोधी तेंचि मद्यपान ॥ विषमानें भिन्न । केलें शुद्धाशुद्ध ॥ ३ ॥ तुका ह्मणे नीत । बरवें अनुभवें उचित ॥ तरी काय हित । मोलें घ्यावें लागतें ॥ ४ ॥

॥ ४९०८ ॥ भूक पोटापुरती । तृष्णा भरवी वाखती ॥ करवी फजी-ती । हांवें भार वाढला ॥ १ ॥ कुळिकेसी लांस फांस । डोई दाढी बोडवी दोष ॥ अविहितनाश । करवी वजन चुकतां ॥ २ ॥ विधिसेवनें विहितें । कार्यकारणापुरतें ॥ न बाटे जो चित्तें । अधर्माचिया तो त्यागी ॥ ३ ॥ आ-ज्ञापालणें ते सेवा । भय धरोनियां जीवा ॥ तुका ह्मणे ठेवा । ठेविला तो जतन ॥ ४ ॥

॥ ४९०९ ॥ उभा ऐल थडी । तेणें घालूं नये उडी ॥ १ ॥ पुढें गे-ल्याचे उपाय । करावे ते केले काय ॥ २ ॥ दिसतें आहारीं । नये जाऊं ऐशावरी ॥ ३ ॥ आळसाची धाडी । तुका म्हणे बहु नाडी ॥ ४ ॥

॥ ४९१० ॥ शक्ती द्याव्या देवा । नाहीं पार्थिवाची सेवा ॥ १ ॥ मुख्य आहे ऐसा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥ २ ॥ मना पोटीं देव । जाणे जैसा तैसा भाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे सोसें । लागे लाविल्याचें पिसें ॥ ४ ॥

॥ ४९११ ॥ देव तीर्थ येर दिसे जया ओस । तोचि तया दोष जाणतिया ॥ १ ॥ तया बरें फावे देवा चुकवितां । संचिताची सत्ता अंतराय ॥ २ ॥ शुद्धाशुद्ध ठाव पापपुण्याबिज । पाववील दुजे फळभोग ॥ ३ ॥ तुका म्हणे विश्वंभरा ऐसें वर्म । चुकलिया धर्म अवघें मिथ्या ॥ ४ ॥

॥ ४९१२ ॥ काय करूं सांगतांही न कळे वर्म । उपस्थित भ्रम उप-जवितो ॥ १ ॥ मन आधीं ज्याचें आलें होईल हातां । तयावरी सत्ता केली चाले ॥ २ ॥ अभुकेचे अंगीं चवी ना सवाद । मिथ्या ऐसा वाद दुराग्रह ॥ ३ ॥ तुका ह्मणे आप राखावें आपणा । संकोचोंचि कोणा नये आतां ॥ ४ ॥

॥ ४९१३ ॥ अमृत अन्हेरें उचळलें जातां । विष आर्तभूतां आवश्यक ॥ १ ॥ आदरासी मोल नये लावूं केजें । धीर शुद्धबीजें गोमटा तो ॥ २ ॥ खऱ्याचिये अंगीं आपणचि चाली । लावणी लाविली काय लागे ॥ ३ ॥ तुका ह्मणे चाडे करा वेवसाव । आह्मांसी तो वाव धीर आहे ॥ ४ ॥

॥ ४९१४ ॥ फोडिलें भांडारें । माप घेऊनियां खरें ॥ १ ॥ केली हरि नामाची वरो । मागितलें आतां सरो ॥२॥ देशांत सुकाळ । झाला हारपला काळ ॥ ३ ॥ घ्यावें धणीवरी । तुका ह्मणे लाहान थोरीं ॥ ४ ॥

॥ ४९१५ ॥ पात्र शुद्ध चित्त ग्वाही । न लगे कांहीं सांगणें ॥ १ ॥ शूर तरी सत्य चि व्हावें । सांडी जीवें करुनी ॥ २ ॥ अमुप च सुखमान । स्वामी जन मानावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जैसी वाणी । तैसे मनीं परिपाक ॥ ४ ॥

॥ ४९१६ ॥ किती रांडवंडे । घालूनि व्हाल रे बापुडे ॥ संसाराचें भिडे । कासावीस झालेती ॥ १ ॥ माझ्या स्वामी शरण रिघा । कृपाळुवा पांडुरंगा ॥ ठेवी अंगसंगा । विश्वासियां जवळीं ॥ २ ॥ कांहीं न मागतां भलें । होईल तें चि काम केलें ॥ नसावें आथिलें । कांहीं एका संकल्पें ॥ ३ ॥ तुका ह्मणे भाव । पाववील ठायाठाव ॥ एकविध जीव । ठेविलिया सेवेसी ॥ ४ ॥

॥ ४९१७ ॥ चंचळीं चंचळ निश्चळीं निश्चळ । वाजवी खळाळ उदकासी ॥ १ ॥ सोपें वर्म परि मन नाहीं हातीं । हा हा भूत चित्तीं भ्रम गाढा ॥२ ॥ रविबिंब नाहीं तुटत उदका । छायेची ते नका सरी धरूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भय धरी रज्जूसाठीं । नाहीं साच पोटीं कळलें तों ॥ ४ ॥

॥ ४९१८ ॥ गर्जत जावें नामावळी । प्रेमें टाळी वाहोनि ॥ १ ॥ येणें सुखें पुढती धांवें । भेटी सवें गोपाळा ॥ २ ॥ लोटांगण घाला तळीं । वंदा धुळी संताची ॥ ३ ॥ तुका ह्मणे विठ्ठल लाहो । ऐसा बाहो उभारा ॥ ४ ॥

॥ ४९१९ ॥ मायबाप सर्वे नये धनवित्त । करावें संचित भोगावें तें ॥ १ ॥ ह्मणऊनि लाभ काय तो विचारीं ! नको चालीवरी चित्त ठेवूं ॥ २ ॥ आयुष्य सेवटीं सांडूनि जाणार । नव्हेचि साचार शरीर हें ॥ ३ ॥ तुका ह्मणे काळें लावियलें माप । जमा धरी पापपुण्याची ही ॥ ४ ॥

॥ ४९२० ॥ मोटलें हातीं सोडिल्या गांठी । विकल्या घातले कण ॥ ज्याचे भाग त्यासी देऊन वारिलें । सारुनी लिगाड दान ॥ खरें माप हातीं घेऊनी बैसलों । मानिती ते चौघेजण ॥ खरें वित्त तेथें आले चोजवित । गिराईक संतजन ॥ १ ॥ झाडिला पालव केला हाट वेच । झाली सकाळींच आराणूक ॥ याल तरि तुह्मी करा लगबग। आमचे ते कोणी लोक॥२॥ एक ते उत्तम मध्यम कनिष्ठ । वित्ताचे प्रकार तीन ॥ बहुतां जनाचे बहुत प्रकार । वेगळाले वाण ॥ लाभ हाणि कोणा मुदल झालें । कोणासी पडिलें खाण ॥ अर्धमर्ध कोणीं गुंतोनि राहिले । थोडे तैसे बहु जन ॥ ३ ॥ एके सांतें आले एके गांवींहून । येकामे चि नव्हे जाणें ॥ येतां जातां रुजू नाहीं दिवाणा । काळतोंडीं एकें तेणें ॥ लाग भाग एकी एकानीं गोविलें । मागील पुढिलां ऋणें ॥ तुका म्हणे आतां पाहूं नये वास । साधावें आपुलें पेणें ॥ ४ ॥

॥ ४९२१ ॥ करूनियां शुद्ध मन । नारायण स्मरावा ॥ १ ॥ तरी च हा तरिजे सिंधु । भवबंधू तोडोनियां ॥ २ ॥ तेथें सरे शुद्ध साचे । अंतरींचें बीज तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे लवणकळी । पडतां जळीं तें होय ॥ ४ ॥

॥ ४९२२ ॥ वाट दावी त्याचे गेलें काय । नागवला जो वारितां जाय ॥ १ ॥ ऐसीं मागें ठकलीं किती । सांगतां खाती विषगोळा ॥२॥ विचारोनि पाहे त्यास । न वजे जीवें नव्हे नास ॥ ३ ॥ तुका ह्मणे जो रूसला जीवा । तयासी केशवा काय चाले ॥ ४ ॥

॥ ४९२३ ॥ यासी कोणी ह्मणे निंदेचीं उत्तरें । नागवला खरें तो चि एक ॥ १ ॥ आड वाटे जातां लावी नीट सोई । धर्मनीत तेही ऐसी आहे ॥ २ ॥ नाइकतां सुखें करावें ताडण । पाप नाहीं पुण्य ऐसें फार ॥ ३ ॥ जन्म व्याधि फार चुकतील दुःखें । खंडावा हा सुखें मान त्याचा ॥ ४ ॥ तुका ह्मणे निंब दिलिया वांचून । अंतरींचा सीण कैसा जाय ॥ ५ ॥

॥ ४९२४ ॥ निवडे जेवण सेवटींच्या घांसें । होय त्याच्या ऐसें सकळही ॥ १ ॥ न पाहिजे झाला बुद्धीचा पालट । केली खटपट जाय वांयां ॥ २ ॥ संपादिलें होय धरिलें तें सोंग । विटंबना व्यंग पडि-

लिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे वर्म नेणतां जो रांधी । पाववी ते बुद्धि अवकळा ॥ ४ ॥

॥ ४९२५ ॥ लावुनियां गोठी । चुकवूं आदरिली दिठी ॥ देउनियां मिठी । पळे महिमा थुलिया ॥ १ ॥ पुढें तो चि करी आड । तिचा लोभ तिसी नाड ॥ लावूनी चरफड । हात गोऊनि पळावें ॥ २ ॥ आधीं काकुलती । मोहो घालावा पुढती ॥ तोंडीं पडे माती । फिरता मागे कैचा तो ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । यासी रडवी याचा हेवा ॥ भावें कां हें सेवा । सुखें तुह्मा नार्पिती ॥ ४ ॥

॥ ४९२६ ॥ देह बुद्धि वसे जयाचिये अंगीं । पूज्यता ते जगीं सुख मानी ॥ १ ॥ थोर असे दगा झाला त्यासी हाटीं । सोडोनिया गांठी चोरीं नेली ॥ २ ॥ गांठीचें जाउनि नव्हे तो मोकळा । बांधिलासे गळा दंभलोभें ॥ ३ ॥ पुढिल्या उदिमा झालेंसे खंडण । दिसे नागवण पडे गांठी ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसे बोलतील संत । जाणूनियां घात कोण करी ॥ ५ ॥

॥ ४९२७ ॥ ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला । कुसंगें नाडला तैसा साधु ॥ १ ॥ ओढाळाच्या संगें सात्विक नासलीं । क्षण एक नाडलीं समागमें ॥ २ ॥ डांकाचे संगती सोनें हिन झालें । मोल तें तुटलें लक्ष कोडी ॥ ३ ॥ विषानें पक्वानें गोड कडू झालीं । कुसंगानें केली तैसी परी ॥ ४ ॥ भावें तुका ह्मणे सत्संग हा वरा । कुसंग हा फेरा चौऱ्याशीचा ॥ ५ ॥

॥ ४९२८ ॥ न करावी चिंता । भय न धरावें सर्वथा ॥ १ ॥ दासां साहे नारायण । होय रक्षिता आपण ॥ २ ॥ नलगे परिहार । कांहीं योजावें उत्तर ॥ ३ ॥ न धरावी शंका । नये बोलों ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ४९२९ ॥ संतसंगतीं न करावा वास । एखादे गुण दोष अंगीं येती ॥ १ ॥ मग तया दोषा नाहीं परिहार । होय अपहार सुकृताचा ॥ २ ॥ तुका ह्मणे नमस्कारावें दुरून । अंतरीं धरून राहे रूप ॥ ३ ॥

॥ ४९३० ॥ धोंड्यासवें आदळितां फुटे डोकें । तो तों साच्या दुःखें घामेजेना ॥ १ ॥ इंगळासी सन्निधान अतिसाई । क्षेम देतां कायी सुख वाटे ॥ २ ॥ तुका म्हणे आम्हांसवें जो रुसला । तयाचा अबोला आकाशासीं ॥ ३ ॥

॥ ४९३१ ॥ आतां तळमळ । केली पाहिजे सीतळ ॥ १ ॥ करील तें पाहे देव । पायीं ठेवूनियां भाव ॥ २ ॥ तोचि अन्नदाता । नाहीं आणि-कांची सत्ता ॥ ३ ॥ तुका म्हणे दासा । नुपेक्षिल हा भरंवसा ॥ ४ ॥

॥ ४९३२ ॥ काय दिवस गेले अवघे चि वऱ्हाडें । तें आलें सांकडें कथेमाजी ॥ १ ॥ क्षण एके ठायीं मन स्थिर नाहीं । अराणूक कइं होईल पुढें ॥ २ ॥ कथेचे विरसें दोषा मूळ होय । तरण उपाय कैचा माती ॥ ३ ॥ काय तें सांचवूनि उरलें हें मागें । घटिका एक संगें काय गेलें ॥ ४ ॥ तेचि वाणी येथें करा उजळणी । काढावी मथूनि शब्दरत्नें ॥ ५ ॥ तुका म्हणे होंचि बोलावया चाड । उभयतां नाड हित असे ॥ ६ ॥

॥ ४९३३ ॥ न धरी प्रतिष्ठा कोणाची ही यम । ह्मणतां कां रे राम लाजा ह्मणी ॥ १ ॥ सांपडे हातींचें सोडवील काळा । तो कां वेळोवेळां नये वाचे ॥ २ ॥ कोण लोक जो हा सुटला तो एक । गेले कुंभपाक रवरवांत ॥३॥ तुका ह्मणे हित तों ह्मणा विठ्ठल । न ह्मणे तो भोगील कळेल तें ॥४॥

॥ ४९३४ ॥ ह्मणवितां हरी न ह्मणे तयाला । दरवडा पडिला देहा-माजी ॥ १ ॥ आयुष्यधन सार्चे नेलें यमदूतीं । भुलविला निश्चितीं कामरंगें ॥ २ ॥ नावडे ती कथा देउळासी जातां । भियधनसुता लक्ष तेथें ॥ ३ ॥ कोण नेतो तयां घटिका दिवसा एका । कां रे ह्मणे तुका नागवसी ॥ ४ ॥

॥ ४९३५ ॥ कथे बैसोनि सादरें । सुखचर्चा परस्परें ॥ नवल काय तो उद्धरे । आणीक तरे सुगंधें ॥ १ ॥ पुण्य घेई रे फुकाचें । पाप दुष्टवासने-चें ॥ पेरिल्या बीजाचें । फळ घेई शेवटीं ॥ २ ॥ कथा विरस पाडी आळसें । छळणा करूनि मोडी रस ॥ उडवी आपणासरिसें । विटाळसें नावेसी ॥ ३ ॥ सज्जन चंदनाचे परी । दुर्जन देशत्यागें दूरी ॥ राहे ह्मणे हरी । विनंती करी तुका हे ॥ ४ ॥

॥ ४९३६ ॥ कोण येथें रिता गेला । जो जो आला या ठाया ॥ १ ॥ तातडी ते काय आतां । ज्याची चिंता तयासी ॥ २ ॥ नांवासाठीं नेवें भार । न लगे फार वित्पत्ति ॥ ३ ॥ तुका ह्मणे न लगे जावें । कोठें देवें सुचने ॥ ४ ॥

॥ ४९३७ ॥ शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥ मुखीं अ-मृताची वाणी । देह देवाचे कारणीं ॥ २ ॥ सर्वांगीं निर्मळ । चित्त जैसें गं-गाजळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥ ४ ॥

॥ ४९३८ ॥ शिळा जया देव । तैसा फळे त्याचा भाव ॥ १ ॥ होय ज-तन तें गोड । अंतरा येती नाड ॥ २ ॥ देव जोडे भावें । इच्छेचें तें प्रेम घ्यावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोड दावी । तैशीं फळें आलीं व्हावीं ॥ ४ ॥

॥ ४९३९ ॥ सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार आशा समूळ ॥ निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धि । निर्मळ स्फटिक जैसा ॥ १ ॥ मोक्षाचें तीर्थ न लगे वाराणसी । येती तयापाशीं अवघीं जनें ॥ तीर्थांसी तीर्थ झाला तोचि एक । मोक्ष तेणें दर्शनें ॥ २ ॥ मन शुद्ध तया काय करि-सी माळा । मंडित सकळा भुषणांसी ॥ हरिच्या गुणें गर्जताती सदा । आनं-द तया मानसीं ॥ ३ ॥ तन मन धन दिलें पुरुषोत्तमा । आशा नाहीं कव-णाची ॥ तुका ह्मणे तो परिसाहूनि आगळा । काय महिमा वर्णूं त्याची ॥४॥

॥ ४९४० ॥ समुद्र हा पिता बंधु हा चंद्रमा । भगिनी ते रमा शंखाची या ॥ १ ॥ मेहुणा जयाचा द्वारकेचा हरि । शंख दारोदारीं भीक मागे ॥२॥ दृष्ट हें जाणावें आपुलें स्वहित । तुका ह्मणे मात ऐसी आहे ॥ ३ ॥

॥ ४९४१ ॥ हित नाहीं ठावें जननीजनका । दाविला लौकिकाचार तिंहीं ॥ १ ॥ अंधळ्याचे काठी लागले अंधळें । घात एका वेळे पुढेंमागें ॥ २ ॥ न धरावी चाली- करावा विचार । वरील आहार गळी लावी ॥ ३ ॥ तुका ह्मणे केला निवाडा रोकडा । राउत हा घोडा हातो-हातीं ॥ ४ ॥

॥ ४९४२ ॥ जेथें पाहें तेथें कांडिती भूस । चिपाडें चोखूनि पाहाती रस ॥ १ ॥ काय सांगों देवा भुलले जीव । बहु यांची येतसे कींव ॥ २ ॥ वेटींचें मोटळें लटिकेंचि फुगे । पेणिया जाऊनि भिक्षा मागे ॥ ३ ॥ तुका ह्मणे कां उगे चि खोल । जवळी दाखवी आपणां बोल ॥ ४ ॥

॥ ४९४३ ॥ खोल ओले पडे तें पीक उत्तम । उथळाचा श्रम वांयां जाय ॥ १ ॥ लटिक्याचे आह्मी नव्हों सांटेकरी । थीतें घाली भरी पदरींचें ॥ २ ॥ कोणा इहलोकीं पाहिजे पसारा । दंभ पोट भरायाचे चाडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे कसीं अंगीं जें उतरे । तेंचि येथें सरे जाति-शुद्ध ॥ ४ ॥

॥ ४९४४ ॥ गोमट्या बीजाचीं फळें ही गोमटीं । बाहे तेंचि पोटीं समतुक ॥ १ ॥ जातीच्या संतोषें चित्तासी विश्रांति । परतोनि मागुती

फिरों नेणें ॥ २ ॥ खऱ्याचे पारखीं येत नाहीं तोटा । निवडे तो खोटा टा-ळें दुरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज सत्याचि आवडी । करितां तांतडी येत नाहीं ॥ ४ ॥

॥ ४९४५ ॥ पडिली हे रूढि जगा परिचार । चालविती वेव्हार सत्य म्हूण ॥ १ ॥ मरणाची कांरे नाहीं आठवण । संचिताचा धन लोभ हेवा ॥ २ ॥ देहाचें भय तें काळाचें भातुकें । ग्रासूनी तें एकें ठेविलेंसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं उघडारे डोळे । जाणोनि अंधळे होऊं नका ॥ ४ ॥

॥ ४९४६ ॥ काळाच सारिखीं वाहाती क्षेत्रें । करितां दुसरें फळ नाहीं ॥ १ ॥ ऐसें करसानें ठेविलें करून । भरिलें भरून माप नेमें ॥ २ ॥ शित उष्णकाळीं मेघ वरुषावे । वरुषता वाव होय शीण ॥ ३ ॥ तुका ह्मणे विष अमृताचें किडे । पालट न घडे जीणें तया ॥ ४॥

॥ ४९४७ ॥ आधीं सोज्वळ करावा मारग । चालतां तें मग गोवी नाहीं ॥ १ ॥ ऐसा चालोनियां आला शिष्टाचार । गोवीचा वेव्हार पाप-पुण्य ॥ २ ॥ पळणें तों पळा सांडुनि कांबळें । उपाधीच्या मुळें लाग पावे ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें शूर तो निवडे । पडिले बापुडे काल-चक्रीं ॥ ४ ॥ ॥

॥ ४९४८ ॥ उद्धत त्या जाती । द्रवें रंगल्या उद्धती ॥ १ ॥ ह्मणऊनि बहु फार । त्यांसी असावें अंतर ॥ २ ॥ कैंचें पाठी पोट । गोडविषासी सेवट ॥ ३ ॥ तुका म्हणे सापा । नकळे कुरवाळिलें बापा ॥ ४ ॥

॥ ४९४९ ॥ क्षोभ आणि कृपा मातेची समान । विभाग जतन करुनि ठेवी ॥ १ ॥ क्षणभंगुर ते उपजली चिंता । खरी अखंडता आवडीची ॥ २ ॥ सिकवूं जाणे ते गोमाटियासाठीं । लोभें नाहीं तुटी निश्चयेंसी ॥ ३ ॥ अवघें चि मिथ्या समया आरतें । देता तो उचितें काळ जाणे ॥ ४ ॥ नकरी वे-व्हार नेदी गांजूं कोणा । भेडसावी तान्हें हाऊ आला ॥ ५ ॥ तुका म्हणे करी जिवाची जतन । दचकूनी मन जवळी आणी ॥ ६ ॥

॥ ४९५० ॥ करीं ऐसी धांवाधांवी । चित्त लावीं चरणापें ॥ १ ॥ मग तो माझा मायबाप । घेइल ताप हरूनी ॥ २ ॥ बहुतांच्या मतें गोवा । होऊं जीवा नेदावा ॥ ३ ॥ तुका म्हणे करुणाबोलें । धीर विठ्ठलें निघेना ॥ ४ ॥

॥ ४९९१ ॥ एकविध नारायण । तेथें विषमाचा सीण ॥ पालटों त्रि भिन्न । नये अणुप्रमाण ॥ १ ॥अवघें सारावें गाबाळ। चुकवूनियां कोल्हाळ। आनंदाचें स्थळ । एकाएकीं एकांत ॥ २ ॥ कायावाचामन । स्वरूपींच अनुसंधान ॥ लक्ष भेदी बाण । येणें पाडें लवलाहो ॥ ३ ॥ तुका म्हणे आळस निद्रा । येथें देउनियां चिरा ॥ देउनियां धीरा । मिठी जाणा जागृती ॥ ४ ॥

॥ ४९९२ ॥ विषम वाटे दुरवरी । चालूनि परती धरी ॥ मागील ते उरी । नाहीं उरली भयाची ॥ १ ॥ मुख्य न व्हावा तो नाड । सेवटाचे हातीं गोड ॥ सरलिया चाड । मग कैचे उद्वेग ॥ २ ॥ होता पहिला अभ्यास । समयीं घालावया कास ॥ तेव्हां लटिके दोष । योगें अनुतापाच्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे आहे । बुद्धी केलियानें साहे ॥ जवळी च पाहे । देव वाट स्मरणाची ॥ ४ ॥

॥ ४९९३ ॥ सत्य सागा चि समान । नलगे वेचावें वचन ॥ १ ॥ नारायणा ऐसे दास । येरयेरांची च आस ॥ २ ॥ मळ नाहीं चित्ता । तेथें देवाची च सत्ता ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाण । तें च भल्याचें वचन ॥ ४ ॥

॥ ४९९४ ॥ सत्य माप वाढे । गबाळाची चाली खोडे ॥ १ ॥ उतरे तें कळे कसीं । विखरोन सर्व देशीं ॥२॥ घरामध्यें राजा । नव्हे हो वा पाटपूजा ॥ ३ ॥ तुका ह्मणे साचें । रूप तें दर्पणाचें ॥ ४ ॥

॥ ४९९५ ॥ उचिताचा काळ । साधावया युक्तिबळ ॥ आपलें सकळ । ते प्रसंगीं पाहिजे ॥ १ ॥ नेम नाहीं लाभ हानि । अवचित घडती दोनी । विचारूनि मनीं ॥ पाहिजे तें प्रयोजावें ॥ २ ॥ जाळ जाळा काळें । करपों नेदावें आगळें ॥ जेवितां वेगळें । ज्याचें त्याचें तेथें शोभे ॥ ३ ॥ पाळी नांगर पाभारीं । तन निवडूनि सोंकरी ॥ तुका ह्मणे धरी । सेज जमा सेवटीं ॥ ४ ॥

॥ ४९९६ ॥ हेंही ऐसें तेंही ऐसें । उभय पिसें अविचार ॥ १ ॥अभिमानाचे ठेलाठेलीं । मधीं झाली हिंपुटि ॥ २ ॥ धीरा शांती ठाव नुरे । हाचि उरे आबाळ्या ॥ ३ ॥ कौतुक हें पाहे तुका । काढतां लोकां आधणीं ॥ ४ ॥

॥ ४९९७ ॥ हित जाणे चित्त । कळों येतसे उचित ॥ १ ॥ परिहार ते संपादनी । सत्य कारण कारणीं ॥ २ ॥ वरदळ तें नुतरे कसीं । आगीमध्यें तें रसीं ॥३॥ तुका ह्मणे करुनी खरें । ठेवितां तें पुढें बरें ॥ ४ ॥

॥ ४९५८ ॥ नाहीं सरों येत कोरड्या उत्तरीं । जिव्हाळ्याची बरी ओल ठायीं ॥१॥ आपुलिया हिता मानिसी कारण । सत्ता नारायण साह्य असो ॥ २॥ निर्वाणीं निवाड होतो आगीमुखें । तप्त लोह सुखें धरितां हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे नेम न टळतां बरें । खऱ्यासीचि खरें ऐसें नांव ॥ ४ ॥

॥ ४९५९ ॥ मंगळाचा मंगळ सांटा । विट तोटा नेणे तें ॥ १ ॥ हें भरा सातें आलें । भलें भलें ह्मणवावें ॥ २ ॥ जनीं जनार्दन वसे । येथें दिसे तें शुद्ध ॥ ३ ॥ तुका म्हणे बहुतां मुखें । खरें सुखें ठेवावें ॥ ४ ॥

॥ ४९६० ॥ चित्त तें चिंतन कल्पनेची धांव । जे जे वाढें हांव इंद्रियांची ॥ १ ॥ हात पाव दिसे शरीर चालतां । नांवें बेद सत्ता जीवाची ते ॥ २ ॥ रवीचिये अंगीं प्रकाशक कळा । वचनें निराळा भेद दिला ॥ ३ ॥ तुका ह्मणे माप वचनाच्या अंगीं । मौन्य काय रंगीं निवडावें ॥ ४ ॥

॥ ४९६१ ॥ परद्रव्यपरनारीचा आभिलास । तेथूनि हारास सर्व भाग्या ॥ १ ॥ घटिका दिवस मास वर्षें लागती तीन । बांधलें पतन गांठोडीस ॥ २ ॥ पुढें घात साचा रोकडा शकून । पुढें करी गुण निश्चयेंसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे। एकां तडताथवड । काळ लागे नाड परी खरा ॥ ४ ॥

॥ ४९६२ ॥ तातडीची धांव अंगा आणि भाव । खोळंबा तो वाव निश्चयाचा ॥ १ ॥ ह्मणउनि बरी विचारावी चाली । उरीचि ते बोली कामा येते ॥ २ ॥ कोरडें वैराग्य माजिरा बडिवार । उतरे तो शूर अंगींचें तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरी झऱ्याची ते वाडी । सांचण्या खोली कैसी यांची ॥ ४ ॥

॥ ४९६३ ॥ आपणा लागे काम वाण्याघरीं गुळ । साचे याति कुळ काय कीजे ॥ १ ॥ उकरड्यावरी वाढली तुळसी । टाकावी ते कैसी ठाया गुणें ॥ २ ॥ गाईचा जो भक्ष्य अमंगळ खाय । तीचें दुध काय सेवूं नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय सलपटासी काज । फणसांतील बीज काढुनि घ्यावें ॥ ४ ॥

॥ ४९६४ ॥ राहे उभा वादावादीं । तरी फंदीं सांपडे ॥ १ ॥ लव्हाळ्यासी कोठें बळ । करिल जळ आपुलें ॥ २ ॥ कठिणासी बळजोडा । नम्र पीडा देखेना ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्वरसीं । मिळे त्यासी गोत तें ॥ ४ ॥

॥ ४९६५ ॥ ह्मणउनि झाली तुटी । नाहीं भेटी अहंकारें ॥ १ ॥ दाखविलें देवें वर्म । अवघा भ्रम नासला ॥ २ ॥ हातें मुरगाळितां कान । नाहीं भिन्न वेदना ॥ ३ ॥ तुका ह्मणे एकांतसुखें । अवघें गोतें गुंतलें ॥ ४ ॥

॥ ४९६६ ॥ पायां लावुनियां दोरी । भृंग बांधिला लेंकुरीं ॥ १ ॥ तैसा पावसी बंधन । मग सोडविल कोण ॥ २ ॥ गळां बांधोनियां दोरी । वानर हिंडवी घरोघरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाहें । रीस धापा देत आहे ॥४॥

॥ ४९६७ ॥ मायबापें सांभाळिती । लोभाकारणें पाळिती ॥ १ ॥ तैसा नव्हे देवराव । याचा कृपाळु स्वभाव ॥ २ ॥ मनासारिखें न होतां । बाळकासी मारी माता ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगूं किती । बाप लेंकासी मारिती ॥ ४ ॥

॥ ४९६८ ॥ धन मेळवूनि कोटी । सवें नये रे लंगोटी ॥ १ ॥ पानें खाशील उदंड । अंतीं जासी सुकल्या तोंडें ॥ २ ॥ पलंग न्याहाल्या सुपतीं । शेवटीं गोवऱ्या सांगातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे राम । एक विसरतां श्रम ॥ ४ ॥

॥ ४८६९ ॥ पाषाण प्रतिमा सोन्याच्या पादुका । हें हो हातीं एका समर्थाचे ॥ १ ॥ अनामिका हातीं समर्थाचा सिक्का । न मानितां लोकां येईल कळों ॥ २ ॥ तुका ह्मणे येथें दुराग्रह खोटा । आपुलया अदृष्टा शरण जावें ॥ ३ ॥

॥ ४९७० ॥ सिंदळीसी नाहीं पोराची पै आस । राहे बीज त्यास काय करी ॥ १ ॥ अथवा सेतीं बीज पेरिलें भाजोन । सारा देईल कोण काका साचा ॥ २ ॥ तुका ह्मणे नाहीं राखायाची चाड । तरी कां लिगाड करुनी घेतो ॥ ३ ॥

॥ ४९७१ ॥ संसारा आलिया एक सुख आहे । आठवावे पाये विठोबाचे ॥ १ ॥ येणें होय सर्व संसार सुखाचा । नलगे दुःखाचा लेश कांहीं ॥ २ ॥ घेतील तयांसी सोपें आहे सुख । बोलियेलें मुखें नारायण ॥ ३ ॥ सांगितली सोय करुणासागरें । तुम्हां कां हो बरें न वाटे तें ॥ ४ ॥ तुका म्हणे तेणें उपकार केला । भोळ्याभाविकांला तरावया ॥ ५ ॥

॥ ४९७२ ॥ चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवितें हरीविण ॥ १ ॥ देखवी ऐकवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ॥ २ ॥ मानसाची देव चालवी अहंता । मीचि एक कर्ता म्हणोनियां ॥ ३ ॥

वृक्षाचेंही पान हाले याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ॥ ४ ॥ तुका म्हणे विठो भरला सबाहीं । तया उणें कांहीं चराचरीं ॥ ५ ॥

॥ ४९७३ ॥ आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ॥ १ ॥ देह हें देवाचें धन कुबेराचें । तेथें मनुष्याचें काय आहे ॥ २ ॥ देता देवविता नेता नेवविता । येथें याची सत्ता काय आहे ॥ ३ ॥ निमित्ताचा धनी केला असे प्राणी । माझें माझें ह्मणोनि व्यर्थ गेला ॥ ४ ॥ तुका ह्मणे कां रे नाशवंतासाटीं । देवासवें आटी पाडितोसी ॥ ५ ॥

॥ ४९७४ ॥ सर्वस्वाची साटी । तरि च देवासवें गांठी ॥ १ ॥ नाहीं तरी जया तैसा । भोग भोगवील इच्छा ॥ २ ॥ द्यावें तें चि घ्यावें । ह्मणउनि जीवें जावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे उरी । मागें नुरविता बरी ॥ ४ ॥

॥ ४९७५ ॥ ओले मातीचा भरंवसा । कां रे धरिशी मानसा ॥ १ ॥ डोळे चिरींव चांगले । वृद्धपणीं सरक्या झाले ॥ २ ॥ नाक सरळ चांगलें । येउन हनवटी लागलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आलें नाहीं । तंव हरिला भज रे कांहीं ॥ ४ ॥

॥ ४९७६ ॥ हे तों टाळाटाळी । पारि भोंवता हा काळी ॥ १ ॥ बरें नव्हेल शेवटीं । भय असों द्यावें पोटीं ॥ २ ॥ मुरगाळिल कान । गोसमाळी सावधान ॥ ३ ॥ धन्य ह्मणे आतां । येथें नुधवा माथां ॥ ४ ॥ अबोलणा तुका । ऐसें कांहीं लेखूं नका ॥ ५ ॥

॥ ४९७७ ॥ किती लाजिरवाणा । मरे उपजोनि शाहाणा ॥१॥ एका घाईं न करीं तुटी । न निघें देवासोई भेटी ॥२॥ सोसूनि आबाळी । घायाळ तें ढुंग चोळी ॥ ३ ॥ सावध करी तुका । ह्मणे निजले हो आइका ॥ ४ ॥

॥ ४९७८ ॥ सोईरे धाइरे दिल्या घेतल्याचे । अंत हें काळींचें नाहीं कोणी ॥ १ ॥ सख्या गोत्रबहिणी सुखाचे सांगाती । मोकलुनी देती अंत काळीं ॥ २ ॥ आपुलें शरीर आपणा पारिखें । परावीं होतील नवल कायी ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां सोड यांची आस । धरीं रे या कास पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ४९७९ ॥ क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ॥ १ ॥ तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनि आपसया ॥ २ ॥ तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप ॥ ३ ॥

॥ ४९८० ॥ पानें खाईल जो बैसोनि कथेसी । घडेल तयासी गोहत्या ॥ १ ॥ तमाखु ओढोनि काढला जो धूर । बुडेल तें घर तेणें पापें ॥ २ ॥ कीर्तनीं बडबड करील जो कोणी । वेडूक होऊनी येईल जन्मा ॥ ३ ॥ ज्याचिये मनीं कथेचा कंटाळा । होती त्या चांडाळा बहु जाच ॥ ४ ॥ जाच होती पाठी उडती यमदंड । त्याचें काळें तोंड तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ४९८१ ॥ संसारीं असतां हरीनाम घेसीं । तरीच उद्धरसी पूर्वजांसी ॥ १ ॥ अवघींच इंद्रियें न येतील कामा । जिव्हे रामनामा उच्चारीं वेगीं ॥ २ ॥ शरीरसंपत्ति नव्हे रे आपुली । भ्रांतीची साउली अवघी व्यर्थ ॥ ३ ॥ तुका ह्मणे सार हरिनामउच्चार । येऱ्हवीं येरझार हरिविण ॥ ४ ॥

॥ ४९८२ ॥ आधीं देह पाहतां वाव । कैचा प्रारब्धासी ठाव ॥ १ ॥ कां रे रडतोसी माना । लागें विठ्ठलचरणा ॥ २ ॥ दुजेपण झालें वाव । त्रिभुवनासि नाहीं ठाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे खरे पाहें । विठ्ठल पाहोनियां राहें ॥ ४ ॥

॥ ४९८३ ॥ स्त्रिया धन वा हें खोटें । नागवले मोठे मोठे ॥ १ ॥ म्हणोनि सांडा दोनी । सुख पावाल निदानीं ॥२॥ सर्व दुःखासी कारण । हीं च दोन्हीचीं प्रमाण ॥ ३ ॥ आशा सर्वस्वें सांडावी । तेणें निजपदवी पावावी ॥ ४ ॥ देहलोभें नाडला । घाला यमाचा पडला ॥ ५ ॥ तुका ह्मणे निरापेक्षा । कांहीं न धरावी अपेक्षा ॥ ६ ॥

॥ ४९८४ ॥ पाषाण परिस भांगे जांबूनद । वंशाचा संबंध धातयाचा ॥ १ ॥ सोनियाची पुरी समुद्राचा वेढा । समुदाय गाढा राक्षसांचा ॥ २ ॥ ऐसी सहस्र त्या सुंदरा कामिनी । माजी मुखरणी मंदोदरी । ३ ॥ पुत्रपौत्रांचा लेखा कोण करी । मुख्य पुत्र हरी इंद्रा आणी ॥ ४ चौदा चौकडीया आयुष्यगणना । बंधुवर्ग जाणा कुंभकर्ण ॥ ५ ॥ तुका ह्मणे ज्याचे देव बांदवडी । सांगातें कवडी गेली नाहीं ॥ ६ ॥

॥ ४९८५ ॥ पापाचीं संचितें देहासी दंडणा । तुज नारायणा बोल नाहीं ॥ १ ॥ पेरी कडू जिरें मागे अमृतफळें । अर्का वृक्षा केळें कैसीं येती ॥ २ ॥ सुख अथवा दुःख भोग हा देहाचा । नास हा ज्ञानाचा न करावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां देवा कां रुसावें । मनासी पुसावें काय केलें ॥ ४ ॥

॥ ४९८६ ॥ भय नाहीं भेव । अनुतापीं नव्हतां जीव ॥ १ ॥ जेथें देवाची तळमळ । तेथें काशाचा विटाळ ॥ २ ॥ उच्चारितां दोष । नाहीं उरों देत लेश ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्त । होय आवडी मिश्रित ॥ ४ ॥

॥ ४९८७ ॥ तांबियाचें नाणें न चले खऱ्या मोलें । जरी हिंडविलें देशोदेशीं ॥ १ ॥ करणीचें कांहीं न मने सज्जना । यावें लागे मना वृद्धांचिया ॥ २ ॥ ॥ हिरियासारिखा दिसे शिरगोळा । पारखी ते डोळां न पाहातीं ॥ ३ ॥ देऊनियां भिंग कामाविलें मोतीं । पारखिया हातीं घेतां नये ॥ ४ ॥ तुका म्हणे काय नटोनियां व्यर्थ । आपुलें हें चित्त आपणा ग्वाही ॥ ५ ॥

॥ ४९८८ ॥ चित्ता मिळे त्याचा संग रुचिकर । क्षोभवितां दुर तों चि भले ॥ १ ॥ ऐसी परंपरा आलीसे चालत । भलत्याची नीत त्यागावरी ॥ २ ॥ हो कां पिता पुत्र बंधु कोणी तरि । विजाति संग्रहीं धरूं नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्य पाळावें वचन । अन्यथा आपण करूं नये ॥ ४ ॥

॥ ४९८९ ॥ आपुली कसोटी शुद्ध राखी कारण । आगीनें भूषण अधिक पुट ॥ १ ॥ नाहीं कोणासवें बोलणें लागत । निश्चितीनें चित्तसमाधान ॥ २ ॥ लपविलें तें ही ढेंकरें उमटे । खोटियाचें खोटें उर फोडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे निंदा स्तुति दोन्ही वाव । आपुलाला भाव फळा येतो ॥ ४ ॥

॥ ४९९० ॥ आणिकांच्या घातें मानितां संतोष । सुखदुःख दोष अंगीं लागे ॥ १ ॥ ऐसें मनीं वाहूं नयेती संकल्प । करूं नये पाप भांडवल ॥ २ ॥ क्लेशाची हे चित्तीं राहाते कांचणी । अग्नींत टाकोनी ठाव जाळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे येणें घडे पुण्यक्षय । होणार तें होय प्रारब्धें चि ॥ ४ ॥

॥ ४९९१ ॥ अनंत लक्षणें वाणितां अपार । संतांचें तें घर सांपडेना ॥ १ ॥ जये घरीं संत राहती आपण । तें तुह्मां ठिकाण आतुडेना ॥ २ ॥ ठिकाण धरूनी पाहावे ते संत । उगाच आकांत करूं नये ॥ ३ ॥ संत होऊनियां संतांसीं पाहावें । तरिच तरावें तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ४९९२ ॥ देखीचें तें ज्ञान करावें तें काई । अनुभव नाहीं आपणासी ॥ १ ॥ इंद्रियांचे गोडी ठकलीं बहुतें । सोडितां मागुतें आवरेना ॥ २ ॥

युक्तीचा आहार नीतीचा वेव्हार । वैराग्य तें सार तरावया ॥ ३ ॥ नाव रेवाळितां घाला घाली वारा । तैसा तो पसारा अहंतेचा ॥ ४ ॥ तुका ह्मणे बुद्धि आपुले अधीन । करी नारायण आतुडे तों ॥ ५ ॥

॥ ४९९३ ॥ बोलिलों उत्कर्षें । प्रेमरस दासत्वें ॥ १ ॥ साच करिता नारायण । जया शरण गेलों तो ॥ २ ॥ समर्थ तो आहे ऐसा । धरिली इच्छा पुरवी ॥ ३ ॥ तुका ह्मणे लडिवाळाचें । घावें साचें करूनियां ॥ ४ ॥

॥ ४९९४ ॥ विचा केला ठोवा । ह्मणोनि नांव तो विठोवा ॥ १ ॥ कां रे नेणां साचें नांव । काय वेदासि नाहीं ठाव ॥ २ ॥ शेष स्तुती प्रवर्तला । जिव्हा चिरूनि पलंग झाला ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्ता । ज्याची काळाचिये माथा ॥ ४ ॥

॥ ४९९५ ॥ मथनासाठीं धर्माधर्म । साचें वर्म नवनीत ॥ १ ॥ तें चितें घाटूं नये । आलें जाय नासूनि ॥ २ ॥ सांभाळावें वरावर । वर्म दूर न वजावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे घालें पोट । मग वोटचाटणी ॥ ४ ॥

॥ ४९९६ ॥ साच हा विठ्ठल साच हें करणें । संत जें वचनें बोलियेले ॥ १ ॥ साच तें स्वहित साच ते प्रचित । साच वेद नीत सांगतील ॥ २ ॥ तुका ह्मणे घेती साच साच भावें । लटिकें वर्म ठावें नाहीं त्यांसी ॥ ३ ॥

॥ ४९९७ ॥ जागा घरटी फिरे तस्कराची दिवसाराती । नीदसुरें नाडिलीं असो ऐसीं मागें किती ॥१॥ हाट करी सकळ जन।वस्तु करा रे जतन ॥२॥ हुशार ठायीं । निज निजेलिया पाहीं ॥३॥ सावचित्त असे खरा । लाभ घेउन जाय घरा ॥ ४ ॥ तराळ बोंबे उतराई । राखा आपुलिया भाई ॥ ५ ॥ हरिच्या नामीं घालूं जागा । तुका ह्मणे हुशार गा ॥६॥

॥ ४९९८ ॥ वैभव तें राज्य संपत्ती टाकावी । उदरार्थ मागावी माधोकरी ॥ १ ॥ आपुलें तें आधीं करावें स्वहित । ऐसी आहे नीत स्वधर्माची ॥ २ ॥ वर्ण कुळ जाति याचा अभिमान । सजावा सन्मान लौकिकाचा ॥३॥ तुका ह्मणे राहे एकाकी निःशंक । देऊनियां हाक कंठीं काळ ॥४॥

॥ ४९९९ ॥ बसतां चोरापाशीं तैसी होय बुद्धि । देखतांचि चिंधी मन धांवे ॥ १ ॥ व्यभिचाऱ्यापासीं बैसतां क्षणभरी । देखतांचि नारी मन धांवे ॥ २ ॥ प्रपंचाचा छंद टाकूनियां गोवा । धरावें केशवा हृदयांत ॥ ३ ॥ सांडुनियां देई संसाराची बेडी । कीर्तनाची गोडी धरावीगा ॥४॥

तुका ह्मणे तुला सांगतों मी एक । रुक्मिणीनायक मुखीं गावा ॥ ५ ॥

॥ ५००० ॥ संतांपायीं विन्मुख झाला । तो जरी संगति मागों आला ॥ १ ॥ तरी साह्युनि दुरी जावें । सुखें एकांतीं बैसावें ॥ २ ॥ आत्मचर्चा नाहीं जेथें । अगी लावुनि द्यावी तेथें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । चित्ता समाधान कांहीं ॥ ४ ॥

॥ ५००१ ॥ आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाहीं ऐसा मनीं अनुभवावा ॥ १ ॥ आवडी आवडी कळिवरा काळिवरीं । वरिली अंतरी ताळी पडे ॥ २ ॥ अपूर्व दर्शन मातेपुत्रा भेटी । रडूं मागे तुटी हर्षयोगें ॥ ३ ॥ तुका ह्मणे एकें कळतें दुसरें । बरियाचें बरें आहाचें आहाच ॥ ४ ॥

॥ ५००२ ॥ न मिळती एका एक । जये नगरीचे लोक ॥ १ ॥ भलीं तेथें राहूं नये । क्षणें होईल नकळे काय ॥ २ ॥ नकरितां अन्याय । बळें करीती अपाय ॥ ३ ॥ नाहीं पुराणाची प्रीति । ठायींठायीं पंचाइती ॥ ४ ॥ भल्या बुऱ्या मारी । होतां कोणी न निवारी ॥ ५ ॥ अविचाऱ्या हातीं । देऊनि प्रजा नागविती ॥ ६ ॥ तुका ह्मणे दरी । सुखें सेवावी ते बरी ॥ ७ ॥

॥ ५००३ ॥ विषयांचे लोलिंगत । ते फजीत होतील ॥ १ ॥ नसरे येथें यातिकुळ । शुद्ध मूळबीज व्हावें ॥ २ ॥ शिखासूत्र सोंग वरी । दुराचारी दंड पावे ॥ ३ ॥ तुका म्हणे अभिमाना । नारायणा न सोसे ॥ ४ ॥

॥ ५००४ ॥ समर्थाचे सेवे बहु असे हित । विचार हृदयांत करूनी पाहें ॥ १ ॥ वरकडाऐसा नव्हे हा समर्थ । क्षणेंचि घडित सृष्टी नासे ॥ २ ॥ ज्याची कृपा होतां आपणा ऐसें करी । उरों नेदी उरी दारिद्राची ॥ ३ ॥ ऐशालागीं मन वोळगे अहर्निशीं । तेणें वंद्य होशी ब्रह्मादिकां ॥ ४ ॥ तुका ह्मणे हेंचि आहे पैं मुद्दल । सत्य माझा बोल हाचि माना ॥ ५ ॥

॥ ५००५ ॥ ढाल तरवारें गुंतले हे कर । ह्मणोनी झुंजार कैसा झुंजों ॥ १ ॥ पेटी पडदळे सिले टोप ओझें । हे तों झालें दुजें मरणमूळ ॥ २ ॥ बैसविलें मला येणें आश्वावरी । धांवूं पळूं तरी कैसा आतां ॥ ३ ॥ आसोनि उपाय ह्मणे हे अपाय । ह्मणे हाय हाय काय करूं ॥४॥ तुका ह्मणे हा तो स्वयें परब्रह्म । मुर्ख नेणे वर्म संतचरणें ॥ ५ ॥

॥५००६॥ किती सांगों तरी नाइकति बटकीचे। पुढें सिंदळीचे रडतील ॥ १ ॥ नका नका करूं रांडेची संगती । नेवोनी अधोगती घालिल यम ॥ २ ॥ तुका म्हणे जरी देवीं नाहीं चाड । ह्मणोनि थोबाड फोडिल यम ॥ ३ ॥

॥ ५००७ ॥ नरदेह वांया जाय । सेवीं सद्गुरूचे पाय ॥ १ ॥ सांडोनियां अहंभाव । धरीं भक्ती पुजीं देव ॥ २ ॥ थोराचिये वाटे । जातां भयशोक आटे ॥ ३ ॥ प्रल्हादातें तारी । तुका म्हणे तो कंठीं धरीं ॥ ४ ॥

॥ ५००८ ॥ हरीविण जिणें व्यर्थचि संसारीं । प्रेत अळंकारीं मिरवत ॥ १ ॥ देवाविण शब्द व्यर्थचि कारण । भांड रंजवण सभेसिगा ॥ २॥ आचार करणें देवाविण जोगा । सर्पाचिया अंगा मृदुपण ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय बहु बोलों फार । भक्तीविण नर अभाग्य कीं ॥ ४ ॥

॥ ५००९ ॥ दो दिवसांचा पाहुणा चालतो उताणा । कां रे नारायणा न भजसी ॥ १ ॥ तूं अखंड दुश्चित्ता तुज नेती अवचिता । मग पंढरिनाथा भजसी केव्हां ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐसे आहेत उदंड । तया केशव प्रचंड केवीं भेटे ॥ ३ ॥

॥ ५०१० ॥ शिकवणेसाठीं वाटते तळमळ । पुढें येईल काळ फोडों डोई ॥ १ ॥ तेव्हां त्यासि काय देशील उत्तर । मेळउनी अंतर ठेवितोसि ॥ २ ॥ येथींचिया सोंगें भोरपियाचे परि । होईल तें दुरि शृंगारिलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कां रे राखिलें खरकटें ॥ रागेल्याचे तंट रागेलें का ॥ ४ ॥

॥ ५०११ ॥ लेखी दुखण्यासमान । वेचला नारायणीं क्षण ॥ उद्यांचें आजिच मरण । आणोनि ह्मणे हरि भोक्ता ॥ १ ॥ नाहीं कांहीं पडों येत तुटी । जाणें तो आहे शेवटीं ॥ लाभ विचारोनी पोटीं । होई शेवटीं जागृत ॥ २ ॥ आहे ते उरे कटा । लावुनि चळ आपुला फाटा ॥ पुरे हें न पुरे शेवटा । तरण्या वळकटा सदा वास ॥ ३ ॥ ह्मणोनि मोडावा कांटाळा । अविद्यात्मक कोंवळा ॥ होतील प्रबळा । आशा तृष्णा माया ॥ ४ ॥ क्षण या देहाचें अंतीं । जड होऊन राहेल माती ॥ परदेश ते परवर होती । चिळसविती नाकडोळे ॥ ५ ॥ जंव या नाहीं पातल्या विपात्ति । आयुष्य भविष्य आहे हातीं ॥ लाभ विचारोन गुंती । तुका ह्मणे अंतीं सर्व पिसुनें ॥ ६ ॥

॥ ५०१२ ॥ आजि नव्हे कालिच्या ऐसें । अनारिसें पालटे ॥ १ ॥ आतां लागवेग करा । ज्याचें धरा टाके तें ॥ २ ॥ नका सांगों वाउग्या गोष्टी । चाहुल खोटी ये ठायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोडा माग । आपल्या लागवरूनी ॥ ४ ॥

॥ ५०१३ ॥ खाणोरियांचीं पुसों घरें । जीं हीं बरीं पाळती ॥ १ ॥ सांगती त्या जावें वाटा । धरुनी पोटामध्यें गोष्टी ॥ २ ॥ आली गेली होती ठाया । सत्य छाया कळली ॥ ३ ॥ तुका ह्मणे आपुलें बळ । युक्ति काळ कारण ॥ ४ ॥

॥ ५०१४ ॥ विठ्ठल नावाडा फुकाचा । आळविल्या साटीं वाचा ॥१॥ कटीं कर जैसे तैसे । उभा राहिला न बैसे ॥ २ ॥ न पाहे सिदोरी । जाती कुळ न विचारी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भेटी । हाक देतां उठाउठीं ॥ ४ ॥

॥ ५०१५ ॥ कासवीचे बाळ वाढे कृपादृष्टी । दुधा नाहीं भेटी अंगसंग ॥ १ ॥ नये दाखवीतां प्रेम बोलतां सांगतां । अनुभव चित्ता चित्त जाणे ॥ २ ॥ पोटामध्यें कोणें सांगीतलें सर्पा । उपजत लपा ह्मणऊनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे हें तों विचारावें मनीं । आणिक भल्यांनीं पुसूं नये ॥ ४ ॥

॥ ५०१६ ॥ सोवळा तो झाला । अंगीकार देवें केला ॥ १ ॥ येर करिती भोजन । पोट पोसाया दुर्जन ॥ २ ॥ चुकला हा भार । तयाचीच येरझार ॥ ३ ॥ तुका ह्मणे दास । झाला तया नाहीं नास ॥ ४ ॥

॥ ५०१७ ॥ शुद्ध चर्या हें चि संताचें पूजन । लागत चि धन नाहीं वित्त ॥ १ ॥ सगुणाचे सोई सगुण विश्रांती । आपण चि येती चोजवीत ॥ २ ॥ कीर्तनीं चि वोळे कृपेचा वोरस । दुरीपणें वास संनिधता ॥ ३ ॥ तुका ह्मणे वर्म सांगतों सवंगें । मन लावा लागें स्वहिताच्या ॥ ४ ॥

॥ ५०१८ करिती तया वेवसाव आहे । येथें व्हारे साहे एकां एक ॥ १ ॥ गातां आइकतां समानाचि घडे । लाभें लाभ जोडे विशेषता ॥ २ ॥ प्रेमाचें भरतें भातें घ्यावें अंगीं । नटे टाळी रंगीं शुरत्वेंसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहु-जन्मांचें खंडण । होईल हा सीण निवारोनि ॥ ४ ॥

॥ ५०१९ ॥ घातला दुकान । पढीये तैसा आहे वान ॥ १ ॥ आह्मी भांडारी देवाचे । घ्यावें घ्यावें माप वाचे ॥ २ ॥ उगवूं जाणों मोडी । झाली नव्हे साची जोडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पुडी । मोल तैसी खरी कुडी ॥ ४ ॥

॥ ५०२० ॥ ब्रह्मज्ञान जरी कळे उठाउठी । तरि कां हिंपुटी वेदशास्त्रें ॥ १ ॥ शास्त्रांचें भांडण जप तीर्थाटण । उर्वीचें भ्रमण याचसाटीं ॥ २ ॥ याचसाटीं जप याचसाटीं तप । व्यासें ही अमुप ग्रंथ केले ॥ ३ ॥ याचसाटीं संतपाय हे सेवावे । तरिच तरावें तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ५०२१ ॥ विधीनें सेवन । विषय सागातें समान ॥ १ ॥ मुख्य धर्म देव चित्तीं । आदि अवसान अंतीं ॥ २ ॥ बहु अतिशय खोटा । तर्के होती बहु वाटा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावें । कृपा करीजेते देवें ॥ ४ ॥

॥ ५०२२ ॥ काय उणें आह्मां विठोबाचे पायीं । नाहीं ऐसें कायी येथें एक ॥ १ ॥ तें हें भोंवतालें ठायीं वांटूं मन । बराडी करून दारोदारीं ॥ २ ॥ कोण बळी माझ्या विठोबा वेगळा । आणीक आगळा तुजा सांगा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोक्ष विठोबाचे गांवीं । फुकाचीं लुटावीं भांडारें तीं ॥ ४ ॥

॥ ५०२३ ॥ शोकें शोक वाढे । हिमतीचे धीर गाढे ॥ १ ॥ येथें केलें नव्हे कायी । लंडीपण खोटें भाई ॥ २ ॥ करिती होया होय । परी नव्हे कोणी साह्य ॥ ३ ॥ तुका ह्मणे घडी । साधिलिया एक थोडी ॥ ४ ॥

॥ ५०२४ ॥ हीं च त्यांचीं पंचभूतें । जीवन भातें प्रेमाचें ॥ १ ॥ कळवळा धरिला संतीं । ते निगुती कैवाड ॥ २ ॥ हा च काळ वर्तमान । साधन हीं संपत्ती ॥ ३ ॥ तुका ह्मणे दिवसराती । हें चि खाती अन्न ते ॥ ४ ॥

॥ ५०२५ ॥ दुध दहीं ताक पशूचें पाळण । त्यांमध्यें कारण घृतसार ॥ १ ॥ हें चि वर्म आह्मां भाविकांचे हातीं । ह्मणउनी चित्तीं धरिला राम ॥ २ ॥ लोहो कफ गारा अग्नीचिया काजें । येन्हवी तें ओझें कोण वाहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे खोरीं पाहारा जतन । जोंवरि हें धन हातीं लागे ॥ ४ ॥

॥ ५०२६ ॥ सवंग झालें सवंग झालें । घरा आलें पंढरींचें ॥ १ ॥ आतां हेवा करा सोस । भक्तिरस बहु गोड ॥ २ ॥ पाउलें वेचे चिंता नाहीं । आड कांहीं मग नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे संचिताचें । नेणें कोचें राहो तें ॥ ४ ॥

॥ ५०२७ ॥ कल्पतरू त्या नव्हती बाभुळा । पुरविती फळा इच्छितिया ॥ १ ॥ उदंड त्या गाई ह्मसी आणि शेळ्या । परि त्या निराळ्या

कामधेनु ॥ २ ॥ तुका ह्मणे देव दाखवील दृष्टी । तया सर्वें भेटी थोर पुण्य ॥ ३ ॥

॥ ५०२८ ॥ महुरा ऐसीं फळें नाहीं । आलीं कांहीं गळती ॥ १ ॥ पक्कदशे येती थोडीं । नास आढी वेचे तों ॥ २ ॥ विरळा पावे विरळा पावे । अवघड गोवे सेवटाचे ॥ ३ ॥ उंच निंच परिवार देवी । धन्या ठावी चाकरी ॥ ४ ॥ झळके तेथें पावे आणी । ऐसे क्षणी बहु थोडे ॥ ५ ॥ पावेल तो पैल थडी । ह्मणों गडी आपुला ॥ ६ ॥ तुका ह्मणे उभाऱ्यानें । कोण खरें मानितसे ॥ ७ ॥

॥ ५०२९ ॥ गति अधोगति मनाची युक्ति । मन लावीं एकांतीं साधुसंगें ॥ १ ॥ जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ॥ २ ॥ मान अपमान मनाचें लक्षण । लाविलिया ध्यान तें चि करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौऱ्याशींचा ॥ ४ ॥

॥ ५०३० ॥ स्वयें पाक करी । संशय तो चि धरी ॥ संदेहसागरीं आणीक परी बुडती ॥१॥ जाणे विरळा एक । झालें तेथींचें हें सुख ॥ देखिलें बहुतेक । पुसतां वाट चुकले ॥ २॥ तो चि जाणे सोंवळें । शोधी विकल्पाचीं मुळें ॥ नाचती पाल्हाळें । जे विटाळें कोंडिले ॥ ३ ॥ तोचि साधी संधी । सावध त्रिकाळ जो बुद्धि ॥ संदेहाचा संधी । वेठी आणिक धरियेले ॥ ४ ॥ अखंड तें ध्यान । समबुद्धि समाधान ॥ सोंग वांयांविण । ते झांकून बैसती ॥ ५ ॥ करणें जयासाटीं । जो नातुडे कवणे आटी ॥ तुका ह्मणे साटी । चित्तवित्तें वांचूनी ॥ ६ ॥

॥ ५०३१ ॥ जेथें आठवती स्वामीचे ते पाय । उत्तम ते ठाय रम्य स्थळ ॥ १ ॥ रान अथवा घर एकांत लोकांत । समाधान चित्त तें ते घडी ॥ २ ॥ धन्य तो हा काळ सरे आनंदरूप । वाहतां संकल्प गोविंदाचे ॥३॥ तुका ह्मणे लाभकाळ तोंचि जीणें । भाग्य नारायण उत्तम तें ॥ ४ ॥

॥ ५०३२ ॥ गऱ्हाराचें ज्ञान अवघा रजोगुण । सुखवासी होऊन विषय भोगी ॥१॥ त्यासी जरी ज्ञानउपदेश केला । संगेंविण त्याला राहावेना ॥ २ ॥ तुका ह्मणे संग उत्तम असावा । याविण उपावा काय सांगों ॥३॥

॥ ५०३३ ॥ गहूं एकजाती । परि त्या पाथाणी नासिती ॥ १ ॥ वर्म जाणावें तें सार । कोठें काय थोडें फार ॥ २ ॥ कमाईच्या सारें । जाति दाविती प्रकार ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोल । गुणा मिथ्या फिके बोल ॥ ४ ॥

॥ ५०३४ ॥ धांवे त्यासी फावे । दुजे उगवूनि गोवे ॥ १ ॥ द्यावें भरूनियां घर । मग नाहीं येरझार ॥ २ ॥ धणी उभें केलें । पुंडलिकें या उगलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ठसा । गेला पडोनियां ऐसा ॥ ४ ॥

॥ ५०३५ ॥ सोसें वाढे दोष । झाला न पालटे कस ॥ १ ॥ ऐसें बरवें वचन । कारितां तें नारायण ॥ २ ॥ असे प्रारब्ध नेमें । श्रम चि उरे श्रमें ॥३॥ सुख देते शांती । तुका ह्मणे धरितां चित्तीं ॥ ४ ॥

॥ ५०३६ ॥ बहुतां जन्मां अंतीं । जोडी लागली हे हातीं ॥ १ ॥ मनुष्यदेहा ऐसा ठाव । धरीं पांडुरंगीं भाव ॥ २ ॥ बहु केला फेरा । येथें सांपडला थारा ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाणें । ऐसे भले ते शाहाणे ॥ ४ ॥

॥ ५०३७ ॥ अरे हें देह व्यर्थ जावें । ऐसें जरी तुज व्हावें ॥ द्यूतकर्म मनोभावें । सारिपाट खेळावा ॥ १ ॥ मग कैचें हरिचें नाम । निजेलिया जागा राम ॥ जन्मोजन्मींचा अधम । दुःख थोर साधिलें ॥ २ ॥ विषयसुखाचा लंपट । दासीगमनीं अति धीट ॥ तया तेचि वाट । अधोगती जावया ॥ ३ ॥ अणीक एक कोड । नरका जावयाची चाड ॥ तरी संतनिंदा गोड । करीं कवतुकें सदा ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसें । मना लावी राम पिसें ॥ नाहीं तरी आलिया सायासें । फुकट जासी ठकोनी ॥ ४ ॥

॥ ५०३८ ॥ अरे गिळिलें हो संसारें । कांहीं तरी राखा खरें ॥ दिला करुणाकरें । मनुष्यदेह सत्संग ॥ १ ॥ येथें न घलीं न घलीं आड । संचितसा शब्द नाड ॥ उठाउठीं गोड । बीजें बीज वाढवा ॥२॥ केलें तें क्रियमाण । झालें तें संचित ह्मण ॥ प्रारब्ध जाण । उरवरित उरलें तें ॥३॥ चित्त खोटें चालीवरी । रोग भोगाचे अंतरीं ॥ रसने अनावरी । तुका म्हणे ढुंग वाहे ॥४॥

॥ ५०३९ ॥ लाभ झाला बहुतां दिसीं । लाहो करा पुढें नासी ॥ मनुष्यदेहा ऐसी । उत्तमजोडी जोडिली ॥ १ ॥ घेईं हरिनाम सादरें । भरा सुखाचीं भांडारें ॥ झालिया व्यापारें । लाहो हेवा जोडीचा ॥ २ ॥ घेऊनियां माप हातीं । काळ मोवी दिवसरात्रीं ॥ चोर लाग घेती । पुढें तैसें पळावें ॥ ३ ॥ हित सावकासें । ह्मणे करीन तें पिसें ॥ हातीं काय ऐसें । तुका ह्मणे नेणसी ॥ ४ ॥

॥ ५०४० ॥ आयुष्य वेचूनि कुटुंब पोसिलें । काय हित केलें सांग बापा ॥ १ ॥ फुकाचा चाकर झालासी कावाडी । नाहीं सुख घडी भोगाव-

या ॥ २ ॥ दुर्लभ मनुष्यजन्म कष्टें पावलासी । दिला कुटुंबासी कामभोग ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें आयुष्य नासिलें । पाप तें सांचिलें पतनासी ॥३॥

॥ ५०४१ ॥ अभिमानी पांडुरंग । गोवा काशाचा हो मग ॥ १ ॥ अनुसरा लवलाहीं । नका विचार करूं कांहीं ॥ २ ॥ कोठें राहतील पापें । झालिया हो अनुताप ॥ ३ ॥ तुका ह्मणे येचि घडी । उभ्या पाववील थडी ॥ ४ ॥

॥ ५०४२ ॥ अनुतापें दोष । जाय न लगतां निमिष ॥ १ ॥ परि तो राहे विसावला । आदीं अवसानीं भला ॥ २ ॥ हेंचि प्रायश्चित्त । अनुतापीं न्हाय चित्त ॥ ३ ॥ तुका ह्मणे पापा । शिवों नये अनुतापा ॥ ४ ॥

॥ ५०४३ ॥ ऐसे सांडुनियां धुरे । किविलवाणी दिसां कां रे ॥ कामें उर भरे । हातीं तुरे मृत्तिका ॥ १ ॥ उदार हा जगदानी । पांडुरंग अभिमानी ॥ तुळसीदळ पाणी । चिंतनाचा भुकेला ॥ २ ॥ न लगे पुसावी चाकरी । कोणी वकील ये घरीं ॥ साचा तोचि करी । पारपत्य सकळ ॥ ३ ॥ नाहीं आडकाटी । तुका ह्मणे जातां भेटी ॥ न बोलतां मिठी । उगीच पायीं घालावी ॥ ४ ॥

॥ ५०४४ ॥ शांतीपरतें नाहीं सुख । येर अवघेंची दुःख ॥ १ ॥ ह्मणउनी शांति धरा । उतराल पैल तीरा ॥ २ ॥ खवळलिया कामक्रोधीं । अंगीं भरती आधिव्याधी ॥ ३ ॥ तुका म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपेंआप ॥ ४ ॥

॥ ५०४५ ॥ धीर तो कारण साह्य होतो नारायण । नेदी होऊं सीण नाहीं चिंता दासांसी ॥ १ ॥ सुखें करावें कीर्तन हर्षें गावे हरिचे गुण । वारी सुदर्शन आपणचि कळिकाळ ॥ २ ॥ जीव वेची माता बाळा जडभारी होतां । तो तों नव्हे दाता माकुतां यां सारिखा ॥ ३ ॥ हें तों माझ्या अनुभवें अनुभवा आलें जीवें । तुका ह्मणे सत्य व्हावें आहाच नये कारणा ॥ ४ ॥

॥ ५०४६ ॥ आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूं नये ॥ १ ॥ मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडे काय रंक ॥ २ ॥ भयाचिया पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ४ ॥

॥ ५०४७ ॥ सत्य सत्यें देतें फळ । नाहीं लागताचि वेळ ॥ १ ॥ ध्यावे देवाचे ते पाय । धीर सकळ उपाय ॥ २ ॥ करावी च चिंता । नाहीं लागत तत्वता ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावें । शरण ह्मणवितां बरवें ॥ ४ ॥

॥ ५०४८ ॥ शूरत्वासी मोल । नये कामा फिके बोल ॥ १ ॥ केला न संडी कैवाड । जीवेंसाटीं तों हे होड ॥ २ ॥ धीर तो कारण । साह्य होतो नारायण ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरि । दासां रक्षितो निर्धारीं ॥ ४ ॥

॥ ५०४९ ॥ लय लक्षूनियां झालों ह्मणती देव । तो ही नव्हे भाव सत्य जाणा ॥ १ ॥ झालों बहुश्रुत न लगे आतां कांहीं । नको राहूं ते ही निश्चितीनें ॥ २ ॥ तपें दानें काय मानिसी विश्वास । बीज फळ त्यास आहे पुढें ॥ ३ ॥ कर्म आचरण यातीचा स्वगुण । विशेष तो गुण काय तेथें ॥४॥ तुका ह्मणे जरी होईल निष्काम । तरि च होय राम देखे डोळां ॥ ५ ॥

॥ ५०५० ॥ आहारनिद्रे नलगे आदर । आपण सादर तेचि होय ॥ १ ॥ परिमितीविणें बोलणें तें वांयां । फार थोडें काय पिंडा पीडी ॥ २॥ समाधान साचें तोचि एक जाणे । आपुलिये खुणे पावोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे होय पीडा तें न करीं । मग राहें परी भलतिये ॥ ४ ॥

॥ ५०५१ ॥ देहीं असोनियां देव । वृथा फिरतो निर्दैव ॥ १ ॥ देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥ २ ॥ नाभी मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं ॥ ३ ॥ साखरेचें मूळ ऊंस । तैसा देहीं देव दिसे ॥ ४ ॥ दुधीं असतां नवनीत । नेणे तयाचें मथित ॥ ५ ॥ तुका सांगे मूढजना । देहीं देव कां पाहाना ॥ ६ ॥

॥ ५०५२ ॥ करणें तें हेंचि करा । नरका अघोरा कां जातां ॥ १ ॥ जयामध्यें नारायण । शुद्ध पुण्य तें एक ॥ २ ॥ शरणांगतां देव राखे । येरां वाखे विघ्नाचे ॥ ३ ॥ तुका ह्मणे लीन व्हावें । कळे भावें वर्म हें ॥४॥

॥ ५०५३ ॥ आणीक नका करूं चेष्टा । व्हाल कष्टा परवडी ॥ १ ॥ सुखें करा हरिकथा । सर्वथा हे तारील ॥ २ ॥ अनाथाचा नाथ देव । अनुभव सत्य हा ॥ ३॥ तुका ह्मणे बहुतां रिती । धरा चित्तीं सकळ ॥ ४ ॥

॥ ५०५४ ॥ संसारसंगें परमार्थ जोडे । ऐसें काय घडे जाणतेनो ॥ १ ॥ हेंडग्याच्या आळां अवघीं चिपाडें । काय तेथें गोडें निवडावीं ॥२॥ ढेकणाचे बाजे सुखाची कल्पना । मूर्खत्व वचना येऊं पाहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे मद्य सांडवी लंगोटी । सांगितला सेटीं विचार त्या ॥ ४ ॥

॥ ५०५५ ॥ आपुलिया आंगें तोडी मायाजाळ । ऐसें नाहीं बळ कोणापाशीं ॥ १ ॥ रांडापोरें त्याग करी कुटुंबाचा । नावरे हेवाचा आणि मन ॥ २ ॥ हर्षामर्ष जों हे नाहीं जों जिराले । तोंवरि हे केले चार सांनीं ॥ ३॥ मुक्त झालों ऐसें बोलों जाये मुखें । तुका ह्मणे दुःखें बांधला तो ॥ ४ ॥

॥ ५०५६ ॥ सावधान ऐसें काय तें विचारा । आलेहो संसारा सकळही ॥ १ ॥ अंतीं समयाचा करणें विचार । वेचती सादर घटिका पळें ॥ २ ॥ मंगळ हें नोहे कन्यापुत्रादिक । राहिला लौकिक अंतरपाट॥ ३ ॥ तुका म्हणे देव अंतरला दुरी । डोळिया अंधारी पडलीसे ॥ ४ ॥

॥ ५०५७ ॥ प्रपंच परमार्थ संपादीन दोन्ही । एकही निदानीं न घडे त्यासी ॥ १ ॥ दोहीं पेंवावरी ठेवूं जातां हात । शेवटीं अपघात शरीराचा ॥ २ ॥ तुका ह्मणे तया दोहींकडे धका । शेवटीं तो नरकामाजी पडे॥ ३ ॥

॥ ५०५८ ॥ पुसावें तें ठायीं आपुल्या आपण । अहंकारा शून्य घालूनियां ॥ १ ॥ येर वाग्जाळ मायेचा अहंकार । वचनाशीं थार अज्ञान तें ॥ २ ॥ फळ तेंचि बीज बीज तें ची फळ । उपनांवें मूळ न पालटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघे गव्हांचे प्रकार । सोनें अलंकार मिथ्या नांव ॥ ४ ॥

॥ ५०५९ ॥ कारणापें असतां दृष्टी । शंका पोटीं उपजेना ॥ १ ॥ शूर मिरवे रणांगणीं । मरणीं च संतोष ॥ २ ॥ पाहिजे तो कळवळा । मग बळा काय उणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे उदारपणें । काय उणें मनाचें । ४ ॥

॥ ५०६० ॥ अहंकार तो नासा भेद । जगीं निंद्य ओंवळा ॥ १ ॥ नातळे तो धन्य यासी । झाला वंशीं दीपक ॥ २ ॥ करवितो आत्महत्या । नेदी सत्या आतळों ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुरुगुरी । माथां थोरी धरोनि ॥४॥

॥ ५०६१ ॥ मणि पडिला दाढेसी मकरतोंडीं । सुखें हस्तें चि काढवेल मौढीं ॥ १ ॥ परि मूर्खाचें चित्त बोधवेना । दुधें कूर्मीच्या पाळवेल सेना ॥ २ ॥ सकळ पृथ्वी हिंडतां कदाचित । ससीसिंगाची प्राप्ति होय तेथें ॥ ३ ॥ अतिप्रयत्नें गाळितां वाळुवेतें । दिव्य तेलाची प्राप्त होय तेथें ॥४॥ अतिक्रोधें खवळला फणी पाहीं । धरूं येतो मस्तकीं पुष्पप्रायी ॥ ५ ॥ पद्दा ब्रह्मानंदे चि एकीं हेळा । महापातकी तो तुका मुक्त केला ॥ ६ ॥

॥ ५०६२ ॥ मृगाचिये अंगीं कस्तुरीचा वास । असे ज्याचा त्यास नसे ठावा ॥ १ ॥ भाग्यवंत घेती वेचुनियां मोलें । भारवाही मेले वाहतां ओझें ॥ २ ॥ चंद्रामृतें तृप्तिपारणें चकोरा । भ्रमरासी चारा सुगंधाचा ॥ ३ ॥

अधिकारी येथें घेती हातवटी । परीक्षवंता दृष्टी रत्न जैसें ॥ ४ ॥ तुका ह्मणे काय अंधळिया हातीं । दिलें जैसें मोतीं वांयां जाय ॥ ५ ॥

॥ ५०६३ ॥ गेली वीरसरी । मग त्यासी रांड मारी ॥ १ ॥ मग नये तैसी सत्ता । गेली मागील आणितां ॥ २ ॥ भंगिलिया चित्ता न ये काशानें सांदितां ॥ ३ ॥ तुका ह्मणे धीर । भंगलिया पाठीं कीर ॥ ४ ॥

॥ ५०६४ ॥ जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥ १ ॥ येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥ २ ॥ प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्व धर्म हरिचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥ ४ ॥

॥ ५०६५ ॥ देवाचे म्हाणोनि देवीं अनादर । हें मोठें आश्चर्य वाटतसे ॥ १ ॥ आतां येरा जना म्हणावें तें कायी । जया भार डोयी संसाराचा ॥ २ ॥ त्यजुनी संसार अभिमान सांटा । जुलुम हा मोटा दिसतसे ॥ २ ॥ तुका म्हणे अळस करूनियां साहे । बळें कैसे पाहें वांयां जाती ॥ ३ ॥

॥ ५०६६ ॥ आंधळ्यासि जन अवघेचि आंधळे । आपणासि डोळे दृष्टी नाहीं ॥ १ ॥ रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासि कारण चवी नाहीं ॥ २ ॥ तुका ह्मणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥ ३ ॥

॥ ५०६७ ॥ रडोनियां मान । कोण मागतां भूषण ॥ १ ॥ देवें दिले तरी गोड । राहे रुचि आणि कोड ॥ २ ॥ लावितां लावणी । विके भीके केज्या दानी ॥ ३ ॥ तुका ह्मणे धीरा । विण कैसा होतो हिरा ॥ ४ ॥

॥ ५०६८ ॥ पूज्य एकासनीं आसनीं आसन । बैसतां गमन मातेशीं तें ॥ १ ॥ सांगतों ते धर्म नीतीचे संकेत । सावधान हित व्हावें तरी ॥ २ ॥ संतां ठायाठाव पूजनाची इच्छा । जीवनीं च वळसा सांपडला ॥ ३ ॥ तुका म्हणे एकाएकीं वरासन । दुर्जे तेथें भिन्न अशोभ्य तें ॥ ४ ॥

॥ ५०६९ ॥ मायबापें जरी सर्पीण बोका । त्याचे संगें सुखा नपवे बाळ ॥१॥ चंदनाचा शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी फोडी प्राण नाशी ॥२॥ तुका म्हणे नरकीं घाली अभिमान । जरी होय ज्ञान गर्व ताठा ॥ ३ ॥

॥ ५०७० ॥ इनामाची भरली पेठ । वाहाती दाट मारग ॥ १ ॥ अवघेची येती वाण । अवघे शकुन लाभाचे ॥ २ ॥ अडचणी त्या

केल्या दुरी । देण्या उरी घेण्याच्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे जोडी झाली । ते आपुली आपणा ॥ ४ ॥

॥ ५०७१ ॥ चोरटें कांचें निघालें चोरी । आपलें तैसें पारखे घरीं ॥ १ ॥नाहीं नफा नागवे आपण । गमाविले कान हात पाय ॥ २ ॥ बुद्धिहीन नये कांहींचि कारणा । तयासवें जाणा तेंचि सुख ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं ठाउकें वर्म । तयासी कर्म वोडवलें ॥ ४ ॥

॥ ५०७२ ॥ बोलावें तें धर्मा मिळे । बरे डोळे उघडूनि ॥ १ ॥ काशासाठीं खावें शेण । जेणें जन थुंकी तें ॥ २ ॥ दुजें ऐसें काय बळी । जें या जाळी अग्नीसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे शूर रणीं । गांढें मनी बुरबुरी ॥ ४ ॥

॥ ५०७३ ॥ वैद्य वांचविती जीवा । तरी कोण ध्यातें देवा ॥ १ ॥ काय जाणों कैसी परी । प्रारब्ध तें ठेवी उरी ॥ २ ॥ नवसें कन्यापुत्र होती तरि कां करणें लागे पती ॥ ३ ॥ जाणे हा विचार । स्वामी तुकयाचा दातार ॥ ४ ॥

॥ ५०७४ ॥ आसुरी स्वभाव निर्दय अंतर । मानसीं निष्ठुर अतिवादी ॥ १ ॥ याति कूळ येथें असे अप्रमाण । गुणाचें कारण असे अंगीं ॥ २ ॥ काळकुट पितळ सोनें शुद्ध रंग । अंगाचेंच अंग साक्षी देतें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरी जाती सर्वे भेटी । नवनीत पोटीं सांठविलें ॥ ४ ॥

॥ ५०७५ ॥ एक नेणतां नाडलीं । एकां जाणिवेची भुली ॥ १ ॥ बोलों नेणें मुकें । वेडें वाचाळ काय निकें ॥ २ ॥ दोहीं सवा नाड । विहीर एकीकडे आड ॥ ३ ॥ तुका ह्मणे कर्म । तुझें कळों नेदी वर्म ॥ ५ ॥

॥ ५०७६ ॥ एवढा प्रभु भावें । तेणें संपुष्टीं राहावें ॥ १ ॥ होय भक्तीं केला तैसा । पुरवी धरावी ते इच्छा ॥ २ ॥ एवढा जगदानी । मागे तुळसी दळ पाणी ॥३॥ आला नांवा रूपा । तुका ह्मणे झाला सोपा ॥४॥

॥ ५०७७ ॥ भले ह्मणवितां संतांचे सेवक । आइत्याची भीक सुखरूप ॥ १ ॥ ठसावितां बहु लागती सायास । चुकल्या घडे नास अल्प वर्म ॥२॥ पाकसिद्धी लागे सांचित आइतें । घडतां सोई तें तेव्हां गोड ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरे सांगतांचि गोष्टी । रणभूमि दृष्टी न पडे तों ॥ ४ ॥

॥ ५०७८ ॥ मोहोऱ्याच्या संगें । सुत नव्हे आगीजोगें ॥ १ ॥ नाहीं तरी साचें भक्ष । काय सांगणें ते साक्ष ॥ २ ॥ स्वामीचिया अंगें । रूप नव्हे कोणाजोगें ॥ ३ ॥ तुका ह्मणे खोडी । देवमनी न देती दडी ॥ ४ ॥

॥ ५०७९ ॥ येथील हा ठसा । गेला पडोनियां ऐसा ॥ १ ॥ घरीं देवाचे अबोला । त्यासि तेचि सवे त्याला ॥ २ ॥ नाहीं पाहावें लागत । एकाएकींच तें रितें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जन । तयामध्यें एवढें भिन्न ॥ ४ ॥

॥ ५०८० ॥ त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं। आमचें त्या कायी असे ओझें ॥ १ ॥ पाषाणाचे पोटीं बैसला दर्दुर । तया मुखीं चार कोण घाली ॥ २ ॥ पक्षी अजगर न करी संचित । तयासि अनंत प्रतिपाळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तया भार घातलिया । उपेक्षीना दयासिंधु माझा ॥ ४ ॥

॥ ५०८१ ॥ चहुं आश्रमांचे धर्म । न राखतां जोडे कर्म ॥ १ ॥ तैसी न्हे भोळी सेवा । एक भावचि कारण देवा ॥ २ ॥ तपें इंद्रियां आघात । क्षणें एका वाताहात ॥ ३ ॥ मंत्र चळे थोडा । तरि धडचि होय वेडा ॥ ४ ॥ व्रतें करितां सांग । तरी एक चुकतां भंग ॥ ५ ॥ धर्म सत्वचि कारण । नाहीं तरी केला सिण ॥ ६ ॥ भूतदयेसि आघात । उंचनीच वाताहात ॥ ७ ॥ तुका ह्मणे दुजें । विधिनिषेधाचें ओझें ॥ ८ ॥

॥ ५०८२ ॥ ओनाम्याच्या काळें । खडे मांडविले बाळें ॥ १ ॥ तेंचि पुढें पुढें काई । मग लागलिया सोई ॥ २ ॥ रज्जु सर्प होता । तोंवरीचि न कळतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे साचें । भय नाहीं बागुलाचें ॥ ४ ॥

॥ ५०८३ ॥ अक्षयी तें झालें । आतां न मोडे रचिलें ॥ १ ॥ पाया पडिला खोले ठायीं । तेथें पुढें चाली नाहीं ॥ २ ॥ होतें विखुरलें । ताळा जमे झडती आलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोली । पुढें कुंटितचि झाली ॥ ४ ॥

॥ ५०८४ ॥ पोटीं जन्मती रोग । तरि कां ह्मणावे आप्तवर्ग ॥ १ ॥ रानीं वसती औषधी । तरि कां ह्मणाव्या निपराधी ॥ २ ॥ तैसें शरीराचें नातें । तुका म्हणे सर्व आप्तें ॥ ३ ॥

॥ ५०८५ ॥ एकांचीं उत्तरें । गोड अमृत मधुरें ॥ १ ॥ ऐशा देवाच्या विभूती । भिन्न प्रारब्धाची गती ॥ २ ॥ एकांचीं वचनें । कडु असंत तीक्ष्णें ॥ ३ ॥ प्रकाराचें तीन । तुका ह्मणे केलें जन ॥ ४ ॥

॥ ५०८६ ॥ वचनें ही नाड । न बोले तें मुकें खोड ॥ १ ॥ दोहीं वेगळें तें हित । बोली अबोलणी नीत ॥ २ ॥ अंधार प्रकाशी । जाय दिवस पावे निशी ॥ ३ ॥ बीज पृथिवीच्या पोटीं । तुका ह्मणे दावी दृष्टी ॥ ४ ॥

॥ ५०८७ ॥ विचारा वांचून । न पवीजे समाधान ॥ १ ॥ देह त्रिगुणांचा बांधा । माजी नाहीं गुण सुदा ॥ २ ॥ देवाचिये चाडे । देवा द्यावें जें जें घडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे होतें । बहु गोमटें उचितें ॥ ४ ॥

॥ ५०८८ ॥ एका बीजा केला नास । मग भोगलें कणीस ॥ १ ॥ कळे सकळां हा भाव । लहानथोरांवरी जीव ॥ २ ॥ लाभ नाहीं फुकासाटीं । केल्याविण जीवासाटीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ॥ ४ ॥

॥ ५०८९ ॥ सांटविले वाण । पैस घातला दुकान ॥ १ ॥ जें ज्या पाहिजे जे काळीं । आहे सिद्ध चि जवळी ॥ २ ॥ निवडिलें साचें । उत्तममध्यमकनिष्ठाचें ॥ ३ ॥ तुका बैसला दुकानीं । दावी मोला ऐसी वाणी ॥ ४ ॥

॥ ५०९० ॥ अवगुण तों कोणीं नाहीं प्रतिष्ठिले । मागें होत आले शिष्टाचार ॥ १ ॥ दुर्बळाच्या नांवें पिटावा डांगोरा । हा तों नव्हे बरा सत्यवाद ॥ २ ॥ मद्य आणि मधु एकरासी नांवें । तरि कां तें खावें आधारें त्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझा उच्छिष्ट प्रसाद । निवडी भेदाभेद वृष्टिन्यायें ॥ ४ ॥

॥ ५०९१ ॥ माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपण चि देव होय गुरु ॥ १ ॥ पढिये देहभावें पुरवितो वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावें ॥ २ ॥ मागें पुढें उभा राहे सांभाळीत । आलिया आघात निवारावे ॥ ३ ॥ योगक्षेम त्याचें जाणे जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ॥ ४ ॥ तुका ह्मणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारूनी ॥ ५ ॥

॥ ५०९२ ॥ उदंड शाहाणे होत तर्कवंत । परि या नेणवे अंत विठोबाचा ॥ १ ॥ उदंडा अक्षरां करोत भरोवरी । परि ते नेणवे थोरी विठोबाची ॥ २ ॥ तुका ह्मणे नाहीं भोळेपणाविण । जाणीव ते सिण रितें माप ॥ ३ ॥

॥ ५०९३ ॥ एका पुरुषा दोघी नारी । पाप वसे त्याचे घरीं ॥ १ ॥ पाप नलगे धुंडावें । लागेल तेणें तेथें जावें ॥ २ ॥ कांहीं दुसरा विचार । नलगे करावा चि फार ॥ ३ ॥ असत्य जे वाणी । तेथें पापाचीच खाणी ॥ ४ ॥ सत्य बोले मुखें । तेथें उचंबळती सुखें ॥ ५ ॥ तुका ह्मणे दोन्ही जवळीच लाभहानी ॥ ६ ॥